# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १६८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.०६ फेब्रुवारी, २०२४ दुपारी ०३:०० वा.

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १६८ वी बैठक **मंगळवार, दि. ०६ फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी ०३:०० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. तसेच सदर बैठकीस मा. कुलगुरु तथा अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद यांच्या पूर्व परवानगीने एक सदस्य ऑनलाईन उपस्थित होते.

सदर बैठकीस ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| २) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ५) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई नामनिर्देशित) | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. शैलेंद्र देवळाणकर, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | डॉ. मलिक सगाजी रोकडे प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि व्यवस्थापन परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | १) दि.२२ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६६ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२) दि.१९ जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६७ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १. दि. २२ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६६ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांताची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>२. दि.१९ जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६७ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांताची सर्वानुमते नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०२ ] | १. दि.०४ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२. दि.२२ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६६ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १. दि.०४ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६५ व्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>२. दि.२२ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६६ व्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०३] | **डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार यांनी डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार व्याख्यानमालेसाठी पूर्वीच्या १ लाखात वाढीव $१२५० अमेरिकन डॉलर्स (भारतीय चलनात अंदाजे रु.१,०४,१००/-) Charles SCHWAB या बँकेचा चेक नं. ०३११००१५७ देणगी स्वरुपात स्विकारण्याची बाब विचारार्थ.**<br><br>टिपणी: डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार व्याख्यानमाला शैक्षणिक वर्ष २०१० पासून आजअखेर केवळ १ लक्ष इतक्या अपुऱ्या निधीवरील प्राप्त व्याजातून काही अंशी खर्च विद्यापीठ फंडातून केला जात आहे.<br>गतवर्षी झालेल्या व्याख्यानादरम्यान व दि.३०/१२/२०२३ रोजी विद्यापीठात झालेल्या बैठकीत डॉ. अनंत लाभसेटवार यांनी देणगी रक्कम वाढ करुन देतो असे सांगितले होते. त्यानुसार डॉ. अनंत लाभसेटवार व त्यांचे प्रतिनिधी यांनी दि.०१/०१/२०२४ रोजी विद्यापीठात आले व त्यांनी $१२५० अमेरिकन डॉलर्स Charles SCHWAB या बँकेचा चेक नं.०३११००१५७ देणगी चेक स्वरुपात डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार व्याख्यानमालेसाठी दिला आहे.<br>डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार यांनी डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार व्याख्यानमालेसाठी पूर्वीच्या १ लाखात वाढीव $१२५० अमेरिकन डॉलर्स (भारतीय चलनात अंदाजे रु.१,०४,१००/-) Charles SCHWAB या बँकेचा चेक नं. ०३११००१५७ देणगी स्वरुपात स्विकारण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.<br>"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१(ट) विद्यापीठाच्या वतीने कोणताही विश्वस्तनिधी, मृत्युपत्रित दान, देणग्या आणि विद्यापीठाकडे करण्यात आलेल्या कोणत्याही जंगम, स्थावर मालमत्तेचे आणि बौध्दिक संपदेचे हस्तांतरण स्वीकारणे;"<br>सबब, डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार यांनी डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार व्याख्यानमालेसाठी पूर्वीच्या १ लाखात वाढीव $१२५० अमेरिकन डॉलर्स (भारतीय चलनात अंदाजे रु.१,०४,१००/-) Charles SCHWAB या बँकेचा चेक नं.०३११००१५७ देणगी स्वरुपात स्विकारण्याची बाब विचारार्थ. | व्याख्यानमाला विभाग |
| ठराव: | **डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार यांनी डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार व्याख्यानमालेसाठी पूर्वीच्या १ लाखात वाढीव $१२५० अमेरिकन डॉलर्स (भारतीय चलनात अंदाजे रु.१,०४,१००/-) Charles SCHWAB या बँकेचा चेक नं. ०३११००१५७ देणगी स्वरुपात स्विकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[०४]</td><td>विद्यापीठ स्तरावर तक्रार निवारण समिती कार्यरत आहे, मात्र अर्ज करण्यासाठी ऑनलाईन सेवा (Online Protal) उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ.<br><br>टिपणी: दि.०७ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र.८ अन्वये खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात आला होता.<br><br>"विद्यापीठाकडे महाविद्यालयाच्या व विद्यार्थ्यांच्या विविध प्रकारच्या तक्रारी असतात. परंतु सोलापूर जिल्ह्यातील अनेक तालुके १०० किलोमीटर पर्यंत लांब असल्याने त्या तक्रारी विद्यार्थी देऊ शकत नाहीत. त्यासाठी विद्यापीठ स्तरावर तक्रार निवारण समिती निर्माण करण्यात यावी व त्यासाठी ऑनलाईन सेवा (Online Portal) उपलब्ध करुन द्यावी, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."<br><br>त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.<br><br>ठराव: सदरचा ठराव हा डॉ. धन्यकुमार जिनपाल बिराजदार यांनी मांडला. त्यास डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी अनुमोदन दिले. विद्यापीठ स्तरावर तक्रार निवारण समिती कार्यरत आहे. मात्र अर्ज करणेसाठी ऑनलाईन सेवा (Online Portal) उपलब्ध करुन देण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.<br><br>सदर ठरावानुसार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी तक्रारी अर्ज करण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन सेवा (Online Portal) उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ.</td><td>विद्यार्थी विकास विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ५६(२)(ख) नुसार विद्यापीठ स्तरावर कार्यरत असणाऱ्या तक्रार निवारण समितीकडे तक्रारी अर्ज करण्यासाठी ऑनलाईन सेवा (Online Protal) उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **विद्यापीठ अधिसभेच्या दि.०७/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१० विचारार्थ.**<br><br>टिपणी: उपरोक्त दि.०७/११/२०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.<br>"विद्यापीठ स्थापन होऊन २० वर्षे झाली आहेत, विद्यापीठात १७० कायम कर्मचारी व १५० पेक्षा जास्त शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत त्यांचा सातत्याने विद्यार्थी, पालक व विविध संस्था शिक्षक यांच्याशी संबंध येत असतो त्यामुळे कर्मचारी विविध स्टेकहोल्डर्स यांच्यातील संबंध सौदार्याचे व समन्वयाचे रहावेत आणि विद्यापीठात कार्यसंस्कृती विकसीत व्हावी म्हणून विद्यापीठ कर्मचाऱ्यांकरीता प्रबोधन वर्ग, उद् बोधन वर्ग व कार्यशाळा तीन महिन्यातून किमान एकवेळा आयोजित करण्याचा प्रस्ताव ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."<br>उपरोक्त ठराव अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केल्यामुळे सदर विषयी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.<br>सबब, विद्यापीठ अधिसभेच्या दि.०७/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१० विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **विद्यापीठ अधिसभेच्या दि.०७/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१० नुसार अधिसभेने केलेली शिफारस स्विकारुन विद्यापीठ कर्मचाऱ्यांकरीता प्रबोधन वर्ग, उदबोधन वर्ग व कार्यशाळा वर्षातून किमान एकवेळा आयोजित करण्यात सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | **३ दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेकरिता महाविद्यालयास वितरीत करण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठ तसेच विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयामध्ये काही प्रमाणात आपत्कालीन व्यवस्था करण्यात येते. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांकडून रु.१०/- याप्रमाणे आपत्कालीन निधी गोळा करण्यात येतो. सदरचा गोळा करण्यात आलेला निधी स्वतंत्र खात्यामध्ये मुदत ठेवीत जमा करुन त्यावर दरवर्षी मिळणाऱ्या व्याजाच्या रकमेचा विविध बाबींसाठी विनियोग करण्यास दि.१९ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.<br>सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने दरवर्षी मिळणाऱ्या व्याजाच्या रकमेचा विविध बाबींसाठी विनियोग करण्यासाठी दि.०६/१२/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये विषय विचारार्थ सादर केला असता, खालीलप्रमाणे ठराव पारीत झाला आहे.<br>ठराव- राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयांतील प्रत्येक विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येणाऱ्या आपत्कालीन निधीवरील व्याजाच्या रक्कमेचा विनियोग (२९,७८,३६७) शासन निर्णय क्रमांक-बैठक २०१३/ प्र.क्र.३२२/१३/विशि-३, दि.१९ ऑक्टोबर, २०१३ च्या अधिन राहून सोबत जोडलेल्या Proposed Plan for Uniln of Interest on Disaster Fund मधील तक्त्यामध्ये नमुद केलेल्या बाबींसाठी खर्च करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>उपरोक्त ठरावानुसार सन २०१७-१८ या वर्षापासून होणाऱ्या प्रस्तावित खर्चात अ.क्र.१ नुसार आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा आयोजनासाठी एकुण ०४ महाविद्यालयांना प्रति महाविद्यालय रु.३०,०००/- याप्रमाणे रु.१,२०,०००/- इतके अनुदान खर्चास मान्यता देण्यात आली आहे.<br>सन २०२२-२३ मध्ये आपत्कालीन निधीच्या एकुण रक्कमेवर व्याजाच्या स्वरुपात रु.९,२५,७४१/- इतकी रक्कम जमा आहे.<br>तरी गेले ५ वर्षापासूनची वाढती महागाई विचारार्थ घेता सन २०२३-२४ या वर्षात ०३ दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या आयोजनाकरिता प्रति महाविद्यालय रु.३०,०००/- इतके अनुदान हे अपुरे पडणार आहे. सदरच्या ०३ दिवसीय आपत्ती व्यवस्थापन शिबीराच्या आयोजनासाठी अंदाजे खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |

| अ. क्र. | तपशील | नग | अंदाजे दर | अंदाजे एकुण रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | भोजन<br>(दररोज १ वेळ १५० विद्यार्थी) | ४५० ताट | १०० | ४५,०००/- |
| २ | चहा (२ वेळ) | ९०० चहा | १० | ९,०००/- |
| ३ | सहभागी प्रमाणपत्र | १५० | १० | १,५००/- |
| ४ | प्रशिक्षक मानधन | ०३ | १००० | ३,०००/- |
| ५ | बॅनर | ०१ | १५०० | १,५००/- |
| | एकुण अंदाजे | | | ६०,०००/- |

सबब, सन २०२३-२४ या वर्षापासून ३ दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या आयोजनाकरिता वरील तक्त्यानुसार होणाऱ्या अंदाजे खर्चासाठी एकुण ०४ महाविद्यालयांना वितरीत करण्यात येणाऱ्या अनुदानात प्रति महाविद्यालय एकुण रक्कम रु.६०,०००/- इतकी वाढीव तरतूद करण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **सन २०२३-२४ या वर्षापासून ३ दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेकरिता एकूण ४ महाविद्यालयास वितरीत करण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रकमेत प्रती महाविद्यालय एकूण रुपये ६०,०००/- (अक्षरी रुपये साठ हजार फक्त) इतकी वाढीव तरतूद करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | **श्री. राजू रामचंद्र भोसले, प्रयोगशाळा सहायक, संगणकशास्त्र संकुल, प्रस्तुत विद्यापीठ यांचे दि.१८/१०/२०२३ रोजीचे विनंती पत्र विचारार्थ.**<br><br>टिपणी: उपरोक्त पत्रान्वये श्री. राजू रामचंद्र भोसले, प्रयोगशाळा सहायक, प्रस्तुत विद्यापीठ यांनी त्यांची पत्नी सौ. तेजस्विनी राजू भोसले यांचे दोन्ही मुत्रपिंड निकामी झाले असल्याचे, तसेच पत्नीचे मुत्रपिंड प्रत्यारोपन शस्त्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक असल्याचे व सदर शस्त्रक्रियेस अंदाजे रु.१०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) इतका खर्च अपेक्षित असल्याचे व सदर रुग्णालयाचे खर्चासंदर्भातील प्रमाणपत्र सादर केल्याचे, तसेच मुत्रपिंड विकाराशी संबंधित औषधोपचार चालू असल्याने सद्य:स्थितीत त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने त्यांना त्यांच्या पत्नीच्या उपचाराकरिता तातडीची गरज म्हणून विद्यापीठ फंडातून रु.५,००,०००/-(अक्षरी रुपये पाच लाख फक्त) अग्रीम (Advance) स्वरुपात मिळणेबाबत, तसेच मुत्रपिंड शस्त्रक्रिया पार पाडल्यानंतर संपूर्ण खर्चाचे परतावा मिळणेकामी सदर खर्चाचा प्रस्ताव शासनास सादर करुन शासनाकडून खर्चाचा परतावा प्राप्त झाल्यानंतर सर्व आगाऊ रक्कम विद्यापीठ निधीमध्ये एकरकमी जमा करण्याची हमी देण्याबाबत त्यांनी उपरोक्त अर्जान्वये विनंती केली आहे.<br>यापूर्वी प्रस्तुत विद्यापीठातील खालील कर्मचाऱ्यांना विद्यापीठ फंडातून रक्कम देण्यात आली असून ती त्यांच्या वेतनातून दरमहा समान हप्त्यात कपात करुन घेण्यात आलेली आहे.<br>१) श्री. सावळगी राजेश जवाहर, जमादार यांना रु. १,५०,०००/- इतकी रक्कम विद्यापीठ फंडातून देण्यात आली होती.<br>२) श्री. जाधव अनिल बाबुराव, सहायक कुलसचिव यांना रु. १,००,०००/- इतकी रक्कम विद्यापीठ फंडातून देण्यात आली होती.<br>३) श्रीमती बागवान निलोफर इकबाल, कनिष्ठ लिपिक यांना रु. १,५०,०००/- इतकी रक्कम विद्यापीठ फंडातून देण्यात आली होती.<br>४) श्री. विवेक जयसिंग कदम, वरिष्ठ लिपिक यांना रु.१,००,०००/- इतकी रक्कम विद्यापीठ फंडातून देण्यात आली होती.<br>५) श्रीमती अनभुले सुप्रिया विवेकानंद, कनिष्ठ लिपिक यांना ही रु.१,००,०००/- इतकी रक्कम विद्यापीठ फंडातून देण्यात आली होती.<br>सबब, श्री. राजू रामचंद्र भोसले, प्रयोगशाळा सहायक, संगणकशास्त्र संकुल, प्रस्तुत विद्यापीठ यांचे दि.१८/१०/२०२३ रोजीचे विनंती पत्र वित्त व लेखा समितीसमोर सादर केले असता खालीलप्रमाणे ठराव करण्यात आलेला आहे.<br><br>ठराव: श्री. राजू रामचंद्र भोसले, प्रयोगशाळा सहायक, संगणकशास्त्र संकुल, प्रस्तुत विद्यापीठ यांना वैद्यकीय तातडी विचारात घेता, त्याच्याकडून रक्कम परतावाबाबत हमी पत्र घेवून अग्रीम रक्कम रुपये ५ लक्ष विशेष बाब म्हणून अदा करण्यास मान्यता देवून व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br><br>सबब, उपरोक्त दि.२७/१२/२०२३ रोजीच्या ठराव क्र. ०३ प्रमाणे वित्त व लेखा समितीने केलेला ठराव विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **श्री. राजू रामचंद्र भोसले, प्रयोगशाळा सहायक यांची वैद्यकीय तातडी विचारात घेता, त्याच्याकडून रक्कम परतावाबाबत हमी पत्र घेवून अग्रीम रक्कम रुपये ५ लक्ष विशेष बाब म्हणून अदा करण्यास व त्यापोटी रु.५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) दरमहा वेतनामधून पूर्ण रक्कम वसुल होईपर्यंत कपात करण्यास तसेच वैद्यकिय प्रतीपूर्तीची रक्कम प्राप्त झाल्यानंतर त्यामधून शिल्लक अग्रीम रक्कम समायोजित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[०८]</td><td>

**सन २०२३-२४ च्या सुधारीत अर्थसंकल्पास व सन २०२४-२५ च्या मुळ अर्थसंकल्पास मान्यतेची बाब विचारार्थ.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाचा सन २०२३-२४ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२४-२५ चा मूळ अर्थसंकल्प तयार करण्याकरीता समान लेखा संहिता कलम २.१२ (i) नुसार वित्त व लेखा समितीची उपसमिती मा. कुलगुरु यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे गठीत करण्यात आली होती.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सदस्याचे नांव</th><th>पद</th></tr>
<tr><td>१.</td><td>मा. देवानंद चिलवंत, मा. कुलपती नियुक्त वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषद सदस्य</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२.</td><td>प्रा. डॉ. गौतम कांबळे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३.</td><td>प्राचार्य, डॉ. सत्यजित शहा, अधिसभा सदस्य</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४.</td><td>श्रीमती रोहिणी तडवळकर, अधिसभा सदस्य</td><td>सदस्या</td></tr>
<tr><td>४.</td><td>सीए श्रेणिक शाह, वित्त व लेखाधिकारी</td><td>सदस्य सचिव</td></tr>
</table>

उपरोक्त उपसमितीने दि.२८ ते ३०/१२/२०२३ व दि.०४/०१/२०२४ ते ०५/०१/२०२४ व दि.१२/०१/२०२४ दरम्यान विविध विभाग/संकुले प्रमुखांसोबत त्यांची मागणी, जमा व खर्चाचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा केली. मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष जमा व खर्च, त्यांची चालू वर्षातील प्रत्यक्ष जमा, खर्च व त्यांची मागणी तसेच पुढील वर्षातील होणारी जमा व खर्चाचे नियोजन व उपलब्ध निधी इत्यादीबाबत आढावा घेण्यात आला व त्यानुसार सुधारीत व मूळ अंदाजपत्रकीय अंदाज ठरविण्यात येऊन सन २०२३-२४ चा सुधारीत व सन २०२४-२५ चा मूळ अर्थसंकल्पाचा मसूदा तयार केलाआहे.

विद्यापीठाचा सन २०२३-२४ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२४-२५ चा मूळ अर्थसंकल्पास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ९४(६)(क) नुसार व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यासाठी वित्त व लेखा समितीच्या दि.२५/०१/२०२४ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र.२ नुसार सादर केला असता, त्यावर सर्वंकष चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

<table>
<tr><td>ठराव</td><td>सन २०२३-२४ च्या सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२४-२५ च्या मूळ अर्थसंकल्पावर सर्वकष चर्चा होऊन दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.</td></tr>
</table>

सबब, विद्यापीठाचा सन २०२३-२४ च्या सुधारित अर्थसंकल्प व सन २०२४-२५ च्या मूळ अर्थसंकल्पास वित्त व लेखा समितीने दुरुस्तीसह केलेली मान्यतेची शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४ (६) (क) व ३१ (ज) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

</td><td>वित्त व लेखा विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**सन २०२३-२४ च्या सुधारीत अर्थसंकल्पास व सन २०२४-२५ च्या मुळ अर्थसंकल्पास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दुरुस्तीसह स्विकारुन, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ज) अन्वये मान्यता देऊन सर्वानुमते अधिसभेस शिफारस करण्यात आली.**

</td><td></td></tr>
</table>

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(१)] | **महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलेपमेंट ॲकडमी (MSFDA) यांच्याकडे ईक्विटी शेअर्स स्वरुपात रक्कम रुपये २ लाख जमा करण्यास तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**<br>संदर्भ: मा.डॉ.निपुण विनायक, आय.ए.एस. अधिकारी, स्टेट प्रोजेक्ट डायरेक्टर, रुसा यांचे दिनांक २३-०१-२०२४ रोजीचे पत्र.<br>टिपणी: संदर्भिय पत्रान्वये मा.डॉ.निपुण विनायक, आय.ए.एस. अधिकारी, स्टेट प्रोजेक्ट डायरेक्टर, रुसा यांनी शासन निर्णयान्वये महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलेपमेंट ॲकडमी (MSFDA) यांचे ४० टक्के ईक्विटी शेअर्स राज्यातील विद्यापीठाकडून भाग स्वरुपात घेणेबाबत सूचित केले आहे. महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलेपमेंट ॲकडमी (MSFDA) यांचे एकूण रुपये १ कोटी आहे.<br>प्रस्तुत विद्यापीठाकडून रुपये २ लक्ष इतके ईक्विटी शेअर्स अपेक्षित असून, अद्यापपर्यंत प्राप्त न झाल्याने रुपये २ लक्ष त्वरीत जमा करणेबाबत कळविले आहे.<br>तरी मा.डॉ.निपुण विनायक यांनी पत्रान्वये कळविल्यानुसार रुपये २ लक्ष ईक्विटी शेअर्स स्वरुपात महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलेपमेंट ॲकडमी (MSFDA) यांच्याकडे वर्ग करण्याची तातडी विचारात घेता मा.कुलगुरुमहोदय यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.<br>सबब, सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलेपमेंट ॲकडमी (MSFDA) यांच्याकडे ईक्विटी शेअर्स स्वरुपात रक्कम रुपये २ लाख जमा करण्यास तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [९(२)] | श्री. राजा उर्फ सुधाकर तुकाराम सरवदे, अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य यांचे दि.०५/०२/२०२४ रोजीचे पत्र विचारार्थ.<br><br>टिपणी: अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. सुधाकर तुकाराम सरवदे यांनी दि.०५/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या विद्यमान कुलसचिव श्रीमती योगिनी रमेश घारे यांना तातडीने सक्तीच्या रजेवर पाठवून उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी सदर विषय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर चर्चेस घेण्याबाबत मा.कुलगुरुमहोदय यांना विनंती केली आहे.<br>त्यानुसार मा.कुलगुरुमहोदय यांनी सदर पत्रावर सदरचा विषय दि.०६/०२/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवण्यात यावा असे पृष्ठांकन केले आहे.<br>सबब, श्री. राजा उर्फ सुधाकर तुकाराम सरवदे, अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य यांचे दि.०५/०२/२०२४ रोजीचे पत्र विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | श्री. राजा उर्फ सुधाकर तुकाराम सरवदे, अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य यांचे दि.०५/०२/२०२४ रोजीचे पत्रान्वये, प्रस्तुत विद्यापीठाच्या विद्यमान कुलसचिव श्रीमती योगिनी रमेश घारे यांना तातडीने सक्तीच्या रजेवर पाठवून उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी सादर केलेला विषय हा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ नुसार व्यवस्थापन परिषदेच्या अधिकार व कर्तव्ये यामध्ये येत नसल्याने सर्वानुमते अमान्य करण्यात आला.<br>तथापि, मा. वरिष्ठ लेखापरिक्षक अधिकारी, प्रधान महालेखाकार कार्यालय, पुणे यांच्या अहवालात Para No. ९ चा समारोप करताना खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविलेले आहे.<br>Comments of the higher authority may be obtained, under intimation to audit<br>वरील निरीक्षणास अनुसरुन पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(३)] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा.विद्यापरिषद सदस्य व मा.अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेची बाब विचारार्थ.** | परीक्षा व मूल्यमापन मंडळ |

टिपणी: संदर्भ- १) दि. १४/०१/२०१९ रोजीची परीक्षा व मूल्यमापन विभागाची टिपणी.

२) दि. १६ जानेवारी, २०१९ रोजी व्यवस्थापन परिषदेचा ठराव, क्र [११(८)]

३) १९ व्या दीक्षांत समारंभाच्या तयारीसाठी गठीत केलेल्या विविध समित्यांच्या समन्वयकांची दि.०५/०२/२०२४ रोजीची संपन्न झालेली बैठक.

विद्यापीठ स्थापनेपासून प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी व्यासपीठावर मा.व्यवस्थापन परिषद सदस्य, मा.विद्यापरिषद सदस्य व मा.अधिष्ठाता यांची बैठक व्यवस्था केली जात होती. संदर्भ क्र. १ च्या मान्यतेच्या अनुषंगाने दि. १६ जानेवारी, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या समोर दीक्षांत समारंभादिवशी व्यासपीठावरील बैठक व्यवस्थे विषयीची बाब सादर करण्यात आली व व्यवस्थापन परिषदेसमोर इतर विद्यापीठाची माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात आली.

| अ.क्र. | विद्यापीठाचे नाव | विद्यापीठाचा अभिप्राय |
|---|---|---|
| १ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | दीक्षांत समारंभादिवशी व्यासपीठावर मा.व्यवस्थापन परिषद सदस्य व मा.अधिष्ठाता यांची बैठक व्यवस्था केली जाते. |
| २ | डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | |
| ३ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | |
| ४ | कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | |
| ५ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | |
| ६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | |
| ७ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | दीक्षांत समारंभादिवशी व्यासपीठावर मा.व्यवस्थापन परिषद सदस्य, मा. विद्यापरिषद सदस्य व मा.अधिष्ठाता यांची बैठक व्यवस्था केली जाते. |

उपरोक्त सादर केलेल्या माहितीच्या व विषयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव व्यवस्थापन परिषदेमध्ये पारित केला आहे.

"प्रस्तूत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, व मा.अधिष्ठाता यांची व्यासपीठावर बैठक व्यवस्था करण्यात यावी व विद्यापरिषद सदस्य यांची मंडपामध्ये अग्रस्थानी (सुरवातीस पहिल्या रांगेत) बैठक व्यवस्था करण्यात यावी असे ठरले.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या १४ व्या दीक्षांत समारंभापासून व्यासपीठावर बैठक व्यवस्था करण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| | परंतू, उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये दि.०५/०२/२०२४ रोजी १९ व्या दीक्षांत समारंभाची आढावा बैठक मा.कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठकीमध्ये व्यासपीठावरील बैठकीबाबत व्यासपीठ व बैठक व्यवस्था समितीचे समन्वयक, श्री. अ.बा.जाधव, सहा.कुलसचिव यांनी व्यासपीठावरील बैठकीमध्ये विद्यापरिषद सदस्यांचा समावेश असावा असा मुद्दा उपस्थित केला व त्यानुसार सुकाणु समितीमध्ये चर्चा केली व सदरील चर्चेमध्ये सुकाणू समितीने विद्यापरिषद सदस्य यांची उपरोक्त ठरावानुसार व्यासपीठाखालील मंडपामध्ये अग्रस्थानी (सुरुवातीच्या पहिल्या रांगेत) बैठक व्यवस्था करण्याऐवजी त्यांची बैठक व्यवस्था व्यासपीठावर बैठक व्यवस्थेमध्ये करण्यात येणेबाबत व्यवस्थापन परिषदेमध्ये सदरील विषय विचारार्थ सादर करण्याबाबत आदेश दिले आहेत.<br>प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभामध्ये मा.कुलपती महोदय उपस्थित राहणार असल्यास राज्यपाल भवनाकडून ज्याप्रमाणे बैठक व्यवस्थेचा मसुदा मान्यता होईल त्याप्रमाणे बैठक व्यवस्था करणे अनिवार्य आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा.विद्यापरिषद सदस्य व मा.अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, मा.विद्यापरिषद सदस्य व मा.अधिष्ठाता यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्थेसंदर्भात दि.१६ जानेवारी, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.११(८) प्रमाणे कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(४)] | **दि.०५/०२/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.**<br><br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.०५/०२/२०२४ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br><br>विद्यापीठ परिनियम S.३३९ (f) नुसार दि.०५/०२/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br><br>सबब, दि.०५/०२/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठंकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **दि.०५/०२/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(५)] | प्रा. देवानंद काशिनार्थ चिलवंत यांनी दि.०५/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे, लिपिक-टंकलेखक गट क (सेवाप्रवेश) नियम २०१७ समान धोरण लागू करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | विद्यापीठाकडून सदरबाबत शासनाकडे पत्र क्र.पुअहोसोविसो/आस्था/२०२३ /८७३६, दि.२८/१२/२०२३ अन्वये अभिप्राय मिळणेबाबत कळविलेले असून सदर पत्रास अनुसरुन प्राप्त होणारा अभिप्राय/मार्गदर्शनानुसार पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९([illegible])] | **वेस्ट व साऊथ झोन आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेतून अखिल भारतीय स्पर्धेत पात्र झालेल्या खेळाडू, संघ मार्गदर्शक व व्यवस्थापकांना २९ ऑगस्ट या क्रीडादिनी ब्लेझर, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरव करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने २९ ऑगस्ट या क्रीडा दिनी दरवर्षी विद्यापीठाकडून आंतर विद्यापीठ व राज्य क्रीडा महोत्सव स्पर्धेमध्ये यश मिळविणाऱ्या खेळाडूंना रोख पारितोषक ब्लेझर व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. मात्र साउथ वेस्ट झोन म्हणजेच दहा राज्याच्या, अर्धा भारताच्या विद्यापीठांच्या स्पर्धेमधून पात्र व विजयी झालेल्या खेळाडूंची अखिल भारतीय स्तरावरती निवड होते, ही स्पर्धा राज्यस्तरापेक्षाही मोठी आहे. त्यामुळे या ठिकाणची कामगिरी ही जवळपास राष्ट्रीय स्तरावरचीच असते तरी विद्यापीठाच्या क्रीडा विकासाला चालना मिळण्यासाठी, तसेच खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्यासाठी, उदयोन्मुख खेळाडू तयार होण्यासाठी साऊथ वेस्ट झोन स्पर्धेमधून अखिल भारतीय स्पर्धेमध्ये पात्र होणाऱ्या सर्व खेळांच्या खेळाडूंना व त्या खेळाच्या संघ मार्गदर्शक व व्यवस्थापकांना विद्यापीठाच्या वतीने रोख पारितोषक, ब्लेझर व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात यावे असा विषय व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी मांडला. | क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ विभाग |
| ठराव: | **वेस्ट व साऊथ झोन आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेतून अखिल भारतीय स्पर्धेत पात्र झालेल्या खेळाडू व प्रशिक्षक यांना २९ ऑगस्ट या क्रीडादिनी ब्लेझर व प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद